## 'जरा वजन ठेवा'

# उत्तरार्धात वजनदार ठरणारं हसरं नाटक

विजय तापस

पुष्पांजली आणि इतर दोन संस्थांनी संयुक्तपणे गेल्या आठवड्यात रंगभूमीवर 'जरा वजन ठेवा' ही कॉमेडी सादर केली आहे. गेल्या दीड-दोन वर्षांत अनेक विनोदी नाटकं रंगभूमीवर आली. त्यातले काही फार्स होते तर काही कॉमेडीज् होत्या. या विनोदी नाटकांच्या लाटेत स्वतःच्या वेगळेपणानं वेगळं ठरणारं नाटक म्हणून 'जरा वजन ठेवा'चा उल्लेख होणं अपरिहार्य आहे. या कॉमेडीचा बाज एखाद्या धमाल फ्रेंच कॉमेडीचा आहे. कथानकात गुंतागुंत माफक प्रमाणात असली तरी एकूण उत्तम कॉमेडीचं जे अचाट तर्कशास्त्र असतं त्याची चांगली प्रत्ययात्मक आखणी या नाटकात झालेली आपल्या अनुभवाला इथं येते. 'जरा वजन ठेवा' या नावाला नाटकाच्या अंतर्गत व्यवस्थेत काही फारसा संदर्भ नाही. पण नाटक एका पात्राच्या शरीर वजनाशी, वजनाच्या चढ-उताराशी साधलं गेलेलं असल्यानं हे नावही एका अर्थानं सुयोग्य ठरतं. या नाटकाचं लेखन राजा पारगावकर यांनी केलं आहे. या नाटकाची कल्पना अतिशय धमाल आहे. ही कल्पनाच मुळात विनोद निर्माण करणारी, गुंतागुंतीची, गोंधळात गंमत आणणारी आणि प्रेक्षकाला सतत हसत ठेवणारी असल्यानं त्यातून आपोआपच उत्तम विनोद निर्माण होतो. अशा प्रकारची कल्पनाच नाटकाला इतर नाटकांपासून वेगळं करते आणि हे नाटक स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण करू शकलेलं आहे. या नाटकातली ही कल्पना म्हणजे एका म्हाताऱ्याच्या शापानं एका गलेलठ्ठाचं वजन झपाट्यानं कमी होणं, दुसऱ्याचं दिशांचं भान जाणं आणि तिसऱ्याचं हातपाय ताठ राहून त्याच्या शिवराळ जीभेवर सतत अतिसात्त्विक शब्दच येणं. आता या कल्पनेच्या गर्भातच विनोदाची लाट लपलेली आहे. या कल्पनेच्या अनुषंगानं आपण आपल्या कल्पनेच्या पातळीवर प्रसंगांची निर्मिती करण्याचा अगदी ढोबळ प्रयत्न केला तरी त्यात हास्याची एक अखंड मालिकाच प्रत्ययाला येऊ शकते. राजा



त्रिकुटाची रंग भरणारी हसवाहसवी : नंदू माधव, अजय वढावकर आणि कुलदीप पवार

नानाविध प्रसंग, घटनांमधून तसंच भाषेच्या गमतीदार वापरातून आणि पात्रांच्या विशिष्ट स्वरूपाच्या स्वभावशैलीतून अनेक सकस, हास्यरसपूर्ण आणि अगदी ओतप्रोत नाट्यमय क्षण प्रेक्षकांच्या पदरात टाकतो. पहिल्या अंकात पुढे येणाऱ्या विचित्र शापकथेसाठी बरंच कथानक लेखकाला खर्ची घालावं लागलं आहे. नाटकातली खरी धमाल दुसऱ्या अंकात येणार असल्यानं आणि प्रेक्षकांच्या नजरेत ती विश्वासार्ह ठरावी, असं दडपण नाटककारावर नकळत असल्यानं पहिला अंक, पुढच्या कल्पनेचा पाया घालण्यात बराच काळ लावतो. प्रसिद्ध

ॲडव्होकेट कांडलीकर (अजय वढावकर), सौ. कांडलीकर (नयना आपटे) आपला दुसरा मधुचंद्र साजरा करण्यासाठी स्वतःच्या कारनं महाबळेश्वरला निघतात आणि गाडीत सौ. कांडलीकरांनी प्रेमानं मिस्टर कांडलीकरांना चिमटा घेतल्यानं त्यांचा गाडीवरचा ताबा सुटतो आणि गाडी एका सतारीतल्या म्हातारीला धक्का देते. या अपघातानं गाळण उडालेले पती-पत्नी घरी परत येतात. गुन्हा झाकणं, दरवाजा वाजताच पतीराजांची पाचावर धारण बसणं, इतरांपासून आपला गुन्हा लपवण्याची केविलवाणी आणि हास्यमूलक धडपड करणं, बायकोच्या काहीशा बावळट, वाचाळ आणि उथळपणानं संकटात सापडणं वगैरे अनेक गोष्टी रंगमंचावर घडत राहतात. कांडलीकरांच्याच इमारतीत राहणारे न्यायमूर्ती गाजरे आणि अपघातानंतर कांडलीकरांचा शोध घेत त्यांच्याकडे आलेला पोलीस इन्स्पेक्टर शरद भेंडे या दोन पात्रांच्या निर्मितीतून न्यायखात्यातील आणि पोलीस यंत्रणेतील भ्रष्टाचार आणि अनैतिकर विनोदाच्या माध्यमातून मार्मिक वाटणारं भाष्य घडतं. नाटकाचं कथानक लपवाछपवीच्या खेळातली वळणं घेत घेत अगदी संथ गतीनं पुढे सरकत राहातं. पहिल्या अंकात ही कॉमेडी फारशी रंगत नाही. ती उसळत नाही आणि कॉमेडी रंगायला जो वेग आवश्यक असतो तोही तिला प्राप्त होत नाही. ती पहिल्या अंकात सरळरेषेत चालत राहाते आणि कांडलीकरांच्या डॉक्टरी तपासण्याच्या प्रसंगात ढेपाळते आणि क्वचित तर जमवत आलेली पकड काहीशी सैलावते आणि सुस्तावते. पहिल्या अंकात गाजरे - सौ

(पान ६ वर)



एकामागून एक प्रसंगांतून प्रेक्षकांना हसवत ठेवलंय : कुलदीप पवार, अजय वढावकर, नयना आपटे आणि नंदू माधव